# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
## अ प्रभाग समिती
## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 03]

दिनांक : 14/12/2021 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर 2021 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 14/12/2021 रोजी सकाळी 11.30 वा. अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सभापती |
| 2. मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. मा.यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. मा.प्रमोद कुटे | सदस्य् |
| 5. मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 6. मा.शर्मिला राजू बाबर | सदस्या |
| 7. मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 8. मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |
| 9. मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू | नामनिर्देशित सदस्य् |

याशिवाय मा.श्रीमती शितल वाकडे - प्र.क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार- कार्यकारी अभियंता(स्थापत्य),मा.श्री प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री के.डी.दरवडे-सहाय्यक आरोग्याधिकारी, मा. श्री संजय खरात-उपअभियंता(स्थापत्य) मा.श्री लांडे बी.पी.-उपअभियंता(विद्युत),मा.श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता (झोनिपु - स्थापत्य), मा.श्रीमती माने के.व्ही.-उपअभियंता(पाणी पुरवठा), श्री कुंभार प्र.गो.- कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा), श्री सगर किरण अरुण- कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा), श्री पवार व्ही.एस.-कनिष्ठ अभियंता(विद्युत) श्री बनसोडे एस.व्ही. - कनिष्ठ अभियंता(विद्युत),श्री संदिप ठोकळे-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य उद्यान) श्री रंगराव कारंडे-क्रिडा पर्यवेक्षक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्यकिय विभाग), श्री सुनिल दत्तू नाळे-उद्यान अधिकारी, श्रीमती धनश्री गजानन भांबुरे-उद्यान /वृक्ष संवर्धन अधिकारी, श्री सुहास साससे-उद्यान सहाय्यक, श्री डी.जी.कांबळे- उद्यान सहाय्यक श्री हनुमंत चाकणकर- उद्यान सहाय्यक इ. अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस कै.जनरल बिपिन रावत त्यांच्या पत्नी कै.मधुलिका रावत तसेच त्यांचे इतर 13 सहकारी यांचा अपघाती मृत्यू झाल्याने दोन मिनिटे शांतता पाळून त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

कार्यपत्रिका क्रमांक २ दिनांक १६/११/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक १**:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील बर्ड व्हॅली उद्यानालगतच्या फुटपाथचे शेजारची जागा राजा शिव छत्रपती चॅरिटेबल ट्रस्ट या सामाजिक संस्थेस ११ महिन्यांसाठी भाडे तत्वावर देणेबाबत.

**विषय क्रमांक २**:- सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दिनांक १०/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

भाटनगर परिसरातील बिल्डिंग नं.९ व १० मध्ये असणारी बिनकामी पाण्याची टाकी तोडून तेथे काँक्रिटीकरण करणेबाबत.

**विषय क्रमांक ३**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१९ मधील दळवीनगर झोपडपट्टी समोरील रस्त्याला लागून असलेल्या मोकळया जागेत चौपाटी करणेबाबत.

**विषय क्रमांक ४**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१९ मधील एम्पायर इस्टेट येथे मोकळया जागेत चौपाटी करणेबाबत.

**विषय क्रमांक ५**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१९ मध्ये असलेला इ झोन या बिल्डिंगमधील गाळा क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करणेबाबत.

**विषय क्रमांक ६**:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड स्टेशन महावीर चौकातील ग्रेड सेपरेटरला **"क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे"** यांचे नाव देणेबाबत.

तसेच दोन्ही पुतळयांचे काम डिसेंबर मध्ये पूर्ण होणार होते ते पूर्ण करणेबाबत.

**विषय क्रमांक ७**:- सन्मा.सदस्या शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक १३/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्रमांक ८**:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक १४/१२/२०२१

दुर्गादेवी टेकडी या उद्यानात सिक्युरीटी गार्ड वाढवून सुरक्षा वाढविणेबाबत तसेच प्रवेशद्वारावर पाण्याच्या प्लॅस्टिक बाटल्या व इतर प्लॅस्टीक जप्त् करणेबाबत.

**विषय क्रमांक ९**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दिनांक १४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१९ मध्ये असलेला आरक्षित असलेले खेळाचे मैदानास सुरक्षा रक्षक मिळणेबाबत व सुशोभिकरण करणेसाठी विद्युत व्यवस्था करणेबाबत.

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 06 — विषय क्रमांक 1

दिनांक 14/12/2021 — विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: अनुराधा गणपत गोरखे — अनुमोदक : शर्मिला बाबर

संदर्भ:- १) सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक 14/12/2021 रोजीचा प्रस्ताव.

राजा शिवछत्रपती चॅरिटेबल ट्रस्ट् ही सामाजिक संस्था सन २००३ पासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून विविध लोकोपयोगी कामे संस्था करत आलेली आहे. सदर संस्थेच्या वतीने प्र.क्र.१० मधील बर्ड व्हॅली उद्यानालगतच्या फूटपाथ शेजारची जागा भाडेतत्वावर मागितली असून त्याद्वारे गरजू नागरिकांसाठी उत्पन्नाचे साधन निर्माण होणार आहे व तसेच महानगरपालिकेस अतिरिक्त् उत्पन्न् यातून मिळू शकेल. तरी बर्ड व्हॅली उद्यानालगतच्या फूटपाथ शेजारची जागा राजा शिवछत्रपती चॅरिटेबल ट्रस्ट् या सामाजिक संस्थेस ११ महिन्यासाठी भाडे तत्वावर देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-----------------------------

ठराव क्रमांक 07 विषय क्रमांक 2

दिनांक: 14/12/2021 विभाग: सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक मा. शैलजा अविनाश मोरे

संदर्भ१) सन्मा.सदस्या कोमल दिपक मेवानी यांचा दिनांक १०/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील भाटनगर परिसरात बिल्डींग नं.९ व १० च्या मागे मोठया प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तेथे पूर्वी नागरिकांकरिता पाण्याची टाकी बनवली होती. पण ती सध्या बिनकामी झाली आहे. त्यावर लोकांनी कचरा टाकून तेथे पूर्णपणे घाण केलेली आहे. तेथे सांडपाणी व ड्रेनेजपाणी पडून पाणी साचत आहे. या घाण परिस्थितीमुळे तेथे रोगराई पसरु शकते.

सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता आपण लवकरात लवकर या ठिकाणी पाणी पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करुन सदर जागेवरील बिनकामी पाण्याची टाकी तोडावी व तो भाग स्वच्छ करुन तेथे काँक्रिटीकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

--------------------------------

ठराव क्रमांक 08 विषय क्रमांक 3

दिनांक 14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक:मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील चिंचवड येथील दळवीनगर झोपडपट्टी समोरील मोकळया जागेत चौपाटी केलेस नागरिकांना सोईचे होईल तसेच व्यवसायिकांनाही चरितार्थाचे साधन होईल. तरी दळवीनगर झोपडपट्टी समोरील रस्त्याला लागून असलेल्या मोकळया जागेत चौपाटी करणेस सदरची जागा ११ महिन्याचे भाडेतत्वावर देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

--------------------------------

ठराव क्रमांक 9 विषय क्रमांक 4

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील पिंपरी येथील एम्पायर इस्टेट येथील मोकळया जागेत चौपाटी केलेस नागरिकांना सोईचे होईल तसेच व्यवसायिकांनाही चरितार्थाचे साधन होईल. तरी एम्पायर इस्टेट येथील हायवेला लागून पुलाखाली मोकळया जागेत चौपाटी करणेस सदरची जागा ११ महिन्याचे भाडेतत्वावर देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10 विषय क्रमांक 5

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील पिंपरी इ झोन या बिल्डींगमध्ये गाळा हा स्मार्ट सिटी यांना स्थलांतरीत करणेत आला असता मागील ४ ते ५ वर्षापासून सदर गाळा हा बंद आहे. त्यामुळे सदर गाळा हा व्यायामशाळा सुरु करणेसाठी क्रिडा विभागाकडे स्थलांतर करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11 विषय क्रमांक 6

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे अनुमोदक :मा. शर्मिला राजू बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड स्टेशन महावीर चौकातील ग्रेड सेपरेटरला **"क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे"** यांचे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच दोन्ही पुतळयांचे काम डिसेंबर मध्ये पूर्ण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 9 विषय क्रमांक 4

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील पिंपरी येथील एम्पायर इस्टेट येथील मोकळया जागेत चौपाटी केलेस नागरिकांना सोईचे होईल तसेच व्यवसायिकांनाही चरितार्थाचे साधन होईल. तरी एम्पायर इस्टेट येथील हायवेला लागून पुलाखाली मोकळया जागेत चौपाटी करणेस सदरची जागा ११ महिन्याचे भाडेतत्वावर देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10 विषय क्रमांक 5

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील पिंपरी इ झोन या बिल्डींगमध्ये गाळा हा स्मार्ट सिटी यांना स्थलांतरीत करणेत आला असता मागील ४ ते ५ वर्षापासून सदर गाळा हा बंद आहे. त्यामुळे सदर गाळा हा व्यायामशाळा सुरु करणेसाठी क्रिडा विभागाकडे स्थलांतर करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11 विषय क्रमांक 6

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे अनुमोदक :मा. शर्मिला राजू बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड स्टेशन महावीर चौकातील ग्रेड सेपरेटरला **"क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे"** यांचे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच दोन्ही पुतळयांचे काम डिसेंबर मध्ये पूर्ण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 14 विषय क्रमांक 9

दिनांक :14/12/2021 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक:मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे अनुमोदक:मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दि.१४/१२/२०२१ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील एम्पायर इस्टेट विस्डम पार्क सोसायटी जवळ असलेले नव्याने चालू झालेले खेळाचे मैदान आरक्षण क्र.१२२ येथे मोठया प्रमाणात महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. त्यामुळे तेथे नुकसान होऊ नये यासाठी त्या ठिकाणी २४ तास सुरक्षा रक्षक नेमणेस व तेथील मैदानास सुशोभिकरण करणेसाठी विद्युत व्यवस्था करणेचे प्रस्तावास मान्यता देणत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे- सभापती,अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:-अक्षेका/9/कावि/103/2021 दिनांक:- 20/12/2021.

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,

सर्व संबंधित ---------------------------